भतवाल हॉस्पिटल
म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर,मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711

आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२९५ ■ मंगळवार २८ जुलै २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26

घरचा स्वाद,
घरची शुध्दता...
शुद्ध खा.. स्वस्थ रहा
नवल
शुध्द घी
म्हशीचे व गायीचे साजुक तुप
मे. नवलमल दौलतराम, बॉम्बेलॉज खाली, आग्रा रोड,धुळे
फोन : (02562) 238661 email : navalgheedhule@gmail.com

# अन्न-औषध निरीक्षक प्रश्नपत्रिका फुटली-पवार
# एमपीएससी योग्य कारवाई करेलच-आयुक्त मुंढे

**मुंबई, दि. २७ : नीट पेपरफुटीवरुन संताप व्यक्त होत असताना राज्यात राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा पेपर फुटल्याचा आरोप आमदार रोहित पवार यांनी केला आहे. अन्न-औषध निरीक्षक पदासाठीचा पेपर फुटल्याचे सांगत त्यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांची भेट घेतली. औषध निरीक्षकपदाच्या परिक्षेचा पेपर फुटल्यासंदर्भात निष्पक्ष व कालबद्ध मर्यादेत चौकशी करण्याची विनंती केली, तसे निवेदनही त्यांनी मुंढे यांना दिले. पेपरफुटीचा विषय आयोगाच्या अखत्यारित येत असल्याने याबाबतची सर्व कागदपत्रे आयोगाकडे सोपवण्यात येतील. आयोग याबाबत योग्य कारवाई करेल, असे आश्वासन तुकाराम मुंढें यांनी दिल्याचे आमदार रोहित पवारांनी स्पष्ट केले.**





महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत २२ मार्च २०२६ रोजी घेण्यात आलेल्या अन्न व औषध निरीक्षक पदासाठीच्या परीक्षेबाबत विविध तक्रारी, उपलब्ध डिजिटल पुरावे तसेच सामाजिक माध्यमांवर प्रसारित झालेल्या माहितीवरून गंभीर स्वरूपाच्या गैरव्यवहार झाल्याची शंका निर्माण झाली आहे. प्राप्त माहितीनुसार, परीक्षेच्या दोन दिवसांपूर्वी कथित प्रश्नपत्रिका व्हॉट्सॲप स्टेटसवर प्रसारित झाल्याचे आरोप आहेत. प्रश्नपत्रिकेचा फुटलेला कथित मजकूर व प्रत्यक्ष परीक्षेतील प्रश्न यामध्ये लक्षणीय साम्य असल्याचे आरोप समोर आले आहेत, अशी माहिती आमदार रोहित पवार यांनी निवेदनात दिली आहे.

संबंधित प्रश्नपत्रिकेबाबत १०० पैकी ९० प्रश्न जुळले आणि मोबाईलवरून नक्कल, अशा स्वरूपाचे संदेश सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाले आहेत. ज्या उमेदवारास २० मार्च २०२६ रोजी परीक्षेतील प्रश्नाचे फोटो पाठवण्यात आले. त्या उमेदवारास परीक्षेत उच्च गुण प्राप्त झाल्याचे देखील समोर आले आहे. या प्रकरणामुळे राज्यातील लाखो **(पान ४ वर)**

## आंदोलन घटनात्मक अधिकार क्रूरतेचे समर्थन नाही - सुप्रीम

नवी दिल्ली, दि. २७ : शांततापूर्ण आंदोलन करणे हा घटनात्मक अधिकार आहे, जो हिरावून घेतला जाऊ शकत नाही. आंदोलन होत आहे म्हणून पोलिसांची क्रूरता किंवा अतिरिक्त बळाचा वापर समर्थनीय ठरू शकत नाही, अशा शब्दात सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली पोलिसांच्या अत्याचारावर खरडपट्टी केली आहे. वीस जुलैस जंतर मंतर येथे झालेल्या पोलीस लाठीमारशी संबंधित याचिकांवर सुनावणी करताना न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवले. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांचा समावेश असलेल्या खंडपीठाने असेही म्हटले की, आंदोलन दरम्यान पोलीस **(पान ४ वर)**

### आ.रोहित पवार यांची चौकशीची मागणी

## औषध निर्माणशास्त्र पेपरफुटी प्रकरणी कौटिल्य अकॅडमीचे प्रवीण पाटील वादात

**नंदुरबार, दि.२७ (प्रतिनिधी)- औषध निर्माणशास्त्राच्या पेपरफुटी प्रकरणात नंदुरबार येथील कौटिल्य अकॅडमीचे संचालक प्रवीण पाटील हे वादाच्या भोवऱ्यात सापडले असून, त्यांच्या चौकशीची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, २० मार्च २०२६ रोजी औषध निर्माणशास्त्र विषयाची प्रश्नपत्रिका फुटल्याचा आरोप करण्यात आला आहे. या विषयाची परीक्षा २२ मार्च २०२६ रोजी झाली होती. प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या एका व्यक्तीने सुमारे ९० गुणांच्या प्रश्नांचा संच प्रवीण पाटील यांच्याकडे पाठविल्याचा आरोप आहे. त्यानंतर हे प्रश्न पीडीएफ स्वरूपात विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आले. या प्रकारासाठी पैशांची देवाणघेवाण झाल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणी आमदार रोहित पवार यांनी चौकशीची मागणी केली असून, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनीही यासंदर्भात आरोप केल्याने राज्यभरात खळबळ उडाली आहे.

**प्रविण पाटलांनी आरोप फेटाळले**

दरम्यान, या सर्व आरोपांचे प्रवीण पाटील यांनी खंडन केले आहे. माझा पेपरफुटी प्रकरणाशी कोणताही संबंध नाही. मी कोणत्याही चौकशीला सामोरे जाण्यास तयार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

## कापडण्याच्या शेतकऱ्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सोनवद पाटचारी दुरुस्त करा - मा.आ.कुणाल पाटील

**धुळे, दि. २७ - सोनवद प्रकल्पासाठी पाणी पुरवठा करणाऱ्या पांझरा नदीपासून निघालेल्या पाटचारीची तातडीने दुरुस्ती करुन पाणी सोडण्याबाबतच्याा सूचना मा.आ.कुणाल पाटील यांनी पाटबंधारे विभागाला दिल्या आहेत. तसेच याबाबत त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चे दरम्यान पाटचारी दुरुस्तीचा प्रश्न तत्काळ मार्गी लावण्याबाबत मागणी केली आहे. दरम्यान आज सोमवार दि.२७ जुलै २०२६ रोजी कापडणे आणि परीसरातील शेतकऱ्यांनी या मागणीबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी तसेच पाटबंधारे विभागाला दिले असून त्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.**



याबाबत सविस्तर वृत्त असे कि, पांझरा नदीतून वाहणाऱ्या पाण्यातून पाटचारीव्दारे शिंदखेडा तालुक्यातील सोनवद प्रकल्प भरला जातो. या प्रकल्पाचा फायदा धुळे **(पान ४ वर)**

## पांझरेत २२७६ क्युसेस विसर्ग नदीकाठवरील गावांना इशारा

धुळे, दि. २७ (प्रतिनिधी)- पांझरा नदीच्या पाणलोट क्षेत्रात सततच्या पावसामुळे तसेच अक्कलपाडा प्रकल्पाच्या वरच्या बाजूस असलेली धरणे ओसंडून वाहत आहेत. त्यात पांझरा, मालनगाव आणि जामखेडी धरणाचा समावेश आहे. या धरणांमधील पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने अक्कलपाडा धरणातील पाण्यात वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर निम्न पांझरा (अक्कलपाडा) मध्यम प्रकल्पातून आज सकाळी दोन हजार २७६ क्युसेक्स पाण्याचा विसर्ग पांझरा नदीपात्रात करण्यात येत असल्याची माहिती पाटबंधारे विभागाने दिली आहे.**(पान ४ वर)**

## पाटील पिता-पुत्र खुन प्रकरणी जीवे ठार मारण्याची धमकी गुन्हा दाखल करा- गाबडा

धुळे, दि.२७- पाटील पिता-पुत्र खुन खटल्याने मुळ फिर्यादीसोबत जात असल्याने गौरव ऊर्फ गोविंद बाजीराव पवार, भगवान नानाभाऊ अहिरे ह.मु. नाशिक मध्यवर्ती कारागृह नाशिक यांनी मयुर ऊर्फ बबुआ सुरेश कंडारे याला धुळ्यातील मंजित अशोक गाबडा याला जीवे ठार मारण्याची सुपारी दिली. गौरव पवार, भगवान अहिरे व बबुआ कंडारे यांच्यावर गुन्हा दाखल करावा. या मागणीचे निवेदन मंजित गाबडा याने जिल्हा पोलीस अधीक्षकांना दिले आहे.

मंजित गाबडा याने दिलेल्या तक्रारी नुसार, पाटील पिता-पुत्राच्या दुहेरी खून खटल्यात गौरव ऊर्फ गोविंद बाजीराव पवार, भगवान नानाभाऊ अहिरे, वैभव सोनु पवार व विक्की वेळीस यांना मा.सत्र न्यायालयाने दुहेरी जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. आरोपी शिक्षा भोगत आहेत. या खटल्यात मंजित गाबडा हा साक्षीदार आहे. खटल्यातील फिर्यादी प्रशांत दगाजीराव पाटील यांच्या सोबत खटल्याच्या पाठपुरवा करण्यासाठी मा.सत्र न्यायालय धुळे, मा.उच्च न्यायालय **(पान ४ वर)**

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,31,450 रु.+3% GST
सोने- 24 K -1,43,500 रु.+3% GST
चांदी- 2,26,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## भादवड आश्रमशाळेचे मुख्याध्यापक लाच स्वीकारताना एसीबीच्या जाळ्यात

**नंदुरबार, दि.२७ (प्रतिनिधी)- नंदुरबार जिल्ह्यातील भादवड येथील शासकीय माध्यमिक आश्रमशाळेचे मुख्याध्यापक विलास मधुकर पाटील (वय ४९) यांना २,३५० ची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) नंदुरबारच्या पथकाने रविवारी रंगेहात पकडले. या प्रकरणी विसरवाडी पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमाच्या कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.**

एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला कर्मचारी शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, भादवड येथे कार्यरत आहेत. त्यांच्या प्रसूती रजेच्या फरकाचे बिल, बालसंगोपन रजेच्या फरकाची दोन बिले तसेच मे महिन्याच्या वेतनाचे बिल काढून देण्यासाठी मुख्याध्यापक विलास पाटील यांनी २,३५० लाचेची मागणी केल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे करण्यात आली होती.

या तक्रारीची २४ जुलै २०२६ रोजी पंचांसमक्ष पडताळणी करण्यात आली. पडताळणीदरम्यान आरोपीने २,३५० लाचेची मागणी करून ती स्वीकारण्यास संमती दर्शविल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर २७ जुलै २०२६ रोजी एसीबीने सापळा रचला. या कारवाईदरम्यान विलास पाटील यांनी पंचांसमक्ष छ२,३५० ची लाच स्वीकारताच पथकाने त्यांना रंगेहात पकडले.

या कारवाईचे पर्यवेक्षण पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी केले. **(पान ४ वर)**

## जोहर युनिव्हर्सिटीच्या ३८ इमारतींवरील पाडण्याची नोटीस रद्द करा; जमीयत उलेमाचे राष्ट्रपतींना निवेदन

**धुळे, दि. २७ - उत्तर प्रदेशातील रामपूर येथील प्रसिद्ध मोहम्मद अली जोहर युनिव्हर्सिटीच्या ३८ इमारतींना तेथील प्रशासनाने दिलेल्या पाडकामाच्या नोटीसमुळे देशभरात खळबळ उडाली आहे. ही कारवाई तात्काळ रद्द करून इमारती पाडण्याला स्थगिती द्यावी, या मागणीसाठी जमीयत उलेमा (अरशद मदनी), धुळे शाखेतर्फे धुळ्याचे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत देशाच्या महामहीम राष्ट्रपती व माननीय पंतप्रधान यांना निवेदन पाठवण्यात आले.**



जिल्हाधिकारी कार्यालयात सादर केलेल्या या निवेदनात जमीयत उलेमाने म्हटले आहे की, या ३८ इमारतींमध्ये वर्गखोल्या, प्रयोगशाळा आणि वसतिगृहांचा समावेश आहे. या इमारतींवर कारवाई झाल्यास येथे शिक्षण घेणाऱ्या हजारो गरीब, वंचित व अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य अंधारात सापडेल आणि चालू शैक्षणिक वर्ष पूर्णपणे उद्ध्वस्त होईल.

निवेदनात पुढे नमूद केले आहे की, अत्यंत कष्टाने आणि निधीतून उभारलेली ही शैक्षणिक संस्था देशाची राष्ट्रीय संपत्ती आहे. केवळ **(पान ४ वर)**





## विजय चौधरींच्या संभाषणाच्या क्लिप व्हायरल मा.खा.हिना गावीत, डॉ.गावितांना शिवीगाळ भोवली

**नंदुरबार, दि.२७ (प्रतिनिधी) - राज्याचे माजी आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित तसेच माजी खासदार डॉ. हिना गावित यांना अश्लील शिवीगाळ केल्याप्रकरणी विजय वसंत चौधरी यांच्यावर अ‍ॅट्रॉसिटीसह गुन्हा नोंदवण्यात आला असून चौधरी यांची पक्षातून हकालपट्टी करावी व त्यांना अटक करावी अशी जोरदार मागणी नंदुरबारच्या जनतेसह संतप्त भाजपा पदाधिकाऱ्यांनी केली आहे. विजय चौधरी यांच्यावर अ‍ॅट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

भारतीय जनता पार्टीचे माजी महामंत्री विजय चौधरी यांच्या विविध क्षेत्रातील व्यक्तींशी संवाद असलेल्या अनेक ऑडिओ क्लिप्स प्रसारित झाल्या आहेत. त्यातून प्रशासनातील राज्यस्तरीय व्यक्ती, भाजपाचे वरिष्ठ नेते तसेच स्थानिक कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्याबाबत चुकीच्या भावना आणि द्वेष पसरविण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

भारतीय जनता पार्टीला नंदुरबार जिल्ह्यात यश मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे डॉ. विजयकुमार गावित आणि गावित परिवार यांच्याबाबत अत्यंत असभ्य व आक्षेपार्ह शब्द वापरल्याचे कथित व्हायरल ऑडिओ क्लिप्समधून समोर आल्याचा दावा करण्यात आला आहे. जिल्ह्याच्या विकासासाठी तसेच पक्षाच्या उभारणीत डॉ. विजयकुमार गावित यांनी मोठे योगदान दिले असताना त्यांच्याविषयी अश्लील भाषा वापरणे हे पक्षशिस्तीला धरून नसल्याचे निवेदनात म्हटले आहे.

पक्षातील विविध नेत्यांविषयी चुकीच्या भावना निर्माण करणे, पक्षविरोधी कारवाया करणे आणि पडद्यामागून पक्षविरोधी शक्तींना मदत करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही विजय चौधरी यांच्यावर करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांना केवळ पदावरून हटविण्याऐवजी पक्षातून तातडीने हकालपट्टी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका कथित ऑडिओ क्लिपमध्ये विजय चौधरी आणि नंदुरबार येथील सामाजिक कार्यकर्ते संदीप चौधरी यांच्यातील मोबाईलवरील संभाषण असल्याचा दावा करण्यात आला आहे. या संभाषणात डॉ. विजयकुमार गावित यांच्यावर पक्षविरोधी कारवायांचे आरोप करत आक्षेपार्ह भाषा वापरल्याचे तसेच डॉ. हिनाताई गावित यांच्याबाबतही अश्लील शिवीगाळ केल्याचे निवेदनात म्हटले आहे.

या प्रकारामुळे जिल्ह्यातील जनतेमध्ये तसेच भाजपाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये संतापाची भावना निर्माण झाल्याचा दावा करण्यात आला असून विजय चौधरी यांच्यावर अ‍ॅट्रॉसिटीसह संबंधित कायद्यांनुसार तातडीने गुन्हा दाखल करावा, अशी मागणी **(पान ४ वर)**

## विजय चौधरींची पक्षातून हकालपट्टी करा व नवीन कार्यकारिणी करा- मागणी

**नंदुरबार,दि.२७ (प्रतिनिधी) - नंदुरबार जिल्ह्यात व्हायरल झालेल्या कथित ऑडिओ क्लिप प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून भाजपाचे प्रदेश पदाधिकारी विजय चौधरी यांची पक्षातून हकालपट्टी करावी तसेच विद्यमान जिल्हा कार्यकारिणी बरखास्त करून नव्या कार्यकारिणीची नियुक्ती करावी, अशी मागणी धडगाव तालुका भाजपाचे अध्यक्ष पिंट्या तुमला पावरा यांनी केली आहे. याबाबत महाराष्ट्र भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठविण्यात आले आहे.**

निवेदनात म्हटले आहे की, सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या कथित ऑडिओ क्लिपमध्ये विजय चौधरी यांच्याशी संबंधित संभाषण असल्याचा दावा केला जात असून, या प्रकरणी गुन्हा दाखल होऊन तपास सुरू आहे. या कथित संभाषणात माजी मंत्री व विद्यमान आमदार डॉ. विजयकुमार गावित तसेच माजी खासदार डॉ. हिनाताई गावित यांच्याविषयी आक्षेपार्ह भाषा वापरण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे पक्षाची प्रतिमा मलिन झाली असून कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचे वातावरण असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच, चौकशी पूर्ण होईपर्यंत विजय चौधरी तसेच विद्यमान जिल्हा कार्यकारिणीचे सर्व संघटनात्मक अधिकार तात्पुरते स्थगित करण्यात यावेत. चौकशीनंतर आरोप सिद्ध झाल्यास विजय चौधरी यांची पक्षातून हकालपट्टी करून नंदुरबार जिल्ह्यासाठी सक्षम, निष्ठावान आणि कार्यक्षम नवीन जिल्हा कार्यकारिणीची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

### भाजपा प्रदेश उपाध्यक्ष

## विजय चौधरी विरुद्ध अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

नंदुरबार, दि.२७(प्रतिनिधी)- माजी खासदार डॉ हीना गावित तसेच आमदार डॉ. विजयकुमार कृष्णराव गावीत यांच्याबाबत कथितरित्या आक्षेपार्ह व अवमानकारक वक्तव्य करून त्याचे कॉल रेकॉर्डिंग सोशल मीडियावर व्हायरल केल्याप्रकरणी भाजपचे माजी महामंत्री विजय वसंत चौधरी (रा. नंदुरबार) यांच्याविरुद्ध नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी रोहन शरद गावीत (वय ३०, व्यवसाय व्यापार, रा. नटावद, ता. जि. नंदुरबार, सध्या प्लॉट क्र. ०६, विरल विहार, खोडाईमाता रोड, नंदुरबार) यांनी फिर्याद दिली आहे.

फिर्यादीनुसार, २६ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजण्यापूर्वी आरोपी विजय चौधरी यांनी संदीप चौधरी यांच्याशी मोबाईलवर संभाषण करताना फिर्यादीच्या **(पान ४ वर)**

## आता ई-२० पेट्रोलचा मुद्दा केजरीवाल आंदोलन करणार

नवी दिल्ली, दि. २७ : आम आदमी पक्षाने वाहनधारकांच्या जिव्हाळ्याच्या ई-२० पेट्रोल या मुद्द्यावरून केंद्र सरकार विरोधात आंदोलन उभारण्याची तयारी सुरू केली आहे. आप पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन या विषयावर येत्या शनिवारी विशेष टाउन हॉल मध्ये बैठक बोलावल्याची घोषणा केली.

पत्रकार परिषदेत बोलताना अरविंद केजरीवाल म्हणाले की, ई-२० पेट्रोलच्या वापरामुळे देशभरातील नागरिकांच्या गाड्या खराब होत आहेत. इंजिनमध्ये गंभीर तांत्रिक बिघाड होत आहेत. वाहनांचे मायलेजही कमालीचे घटले आहे. हे आंदोलन अधिक तीव्र आणि मोठे **(पान ४ वर)**

## धुळे लोकसभेच्या विविध प्रश्नांवर खा.डॉ.बच्छावांनी ना.शहांची घेतली भेट

**नवी दिल्ली, दि.२७ - धुळे लोकसभा मतदारसंघाच्या खासदार डॉ. शोभाताई दिनेश बच्छाव यांनी आज केंद्रीय गृहमंत्री तथा सहकार मंत्री मा. श्री. अमित शाह यांची नवी दिल्ली येथे भेट घेतली. या भेटीदरम्यान धुळे लोकसभा मतदारसंघातील कायदा व सुव्यवस्था, जनतेच्या सुरक्षिततेशी संबंधित विविध प्रश्न तसेच शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हिताशी निगडित महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.**

धुळे लोकसभा मतदारसंघातील कायदा व सुव्यवस्थेच्या सद्यस्थितीबाबत तसेच भविष्यातील आवश्यक उपाययोजनांबाबत केंद्रीय गृहमंत्री श्री. अमित शाह यांच्यासोबत अत्यंत महत्त्वपूर्ण आणि सविस्तर चर्चा झाली. मतदारसंघातील



जनतेची सुरक्षितता अधिक बळकट करण्यासाठी तसेच कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या विविध बाबी खासदार डॉ. शोभाताई बच्छाव यांनी केंद्रीय गृहमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिल्या.

यावेळी धुळे लोकसभा मतदारसंघातील कायदा व सुव्यवस्थेशी संबंधित प्रश्नांवर येत्या काळात ठोस आणि कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. या चर्चेच्या माध्यमातून आगामी काळात धुळे लोकसभा मतदारसंघातील जनतेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मोठ्या स्वरूपात महत्त्वपूर्ण निर्णय आणि ठोस कार्यवाही होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या संदर्भातील पुढील कार्यवाहीबाबत योग्य वेळी जनतेला माहिती देण्यात येणार आहे.

या भेटीदरम्यान नाशिक व धुळे जिल्ह्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताशी संबंधित कांदा खरेदी **(पान ४ वर)**

## बिहार बंद प्रसंगी थेट एके-४७ मधून गोळीबार तीन विद्यार्थी जखमी; सुप्रीम कोर्टात जनहित याचिका

**सिवान, दि.२७ - बिहारमध्ये विद्यार्थी आंदोलनात थेट ए.के.-४७ ने गोळीबार करणाऱ्या एसपी पुरण झा यांचा अंगरक्षक अभिषेक पटेलला निलंबित करण्यात आले आहे. हे प्रकरण आता सर्वोच्च न्यायालयात पोहोचले आहे. आरजेडीचे राज्यसभा खासदार मनोज झा यांनी जनहित याचिका दाखल केली आहे. या प्रकरणावर उद्या (दि. २८) सुनावणी होणार आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या मुद्द्यावरून सरकारवर निशाणा साधत लिहिले की, संपूर्ण व्यवस्थाच घातक झाली आहे. दरम्यान, सीजेपीचे प्रवक्ते सौरभ दास आणि आशुतोष रांका यांनी विद्यार्थ्यांवरील कारवाई सहन केली जाणार नाही, असे म्हटले आहे.**



**एके-४७ मधून जमावाच्या दिशेने गोळीबार**

विद्यार्थी संघटनांच्या बिहार बंद आणि आंदोलन दरम्यान सिवानमध्ये तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. आंदोलन दरम्यान, एसपी पुरण झा यांच्या अंगरक्षकाने जमावाच्या दिशेने एके-४७ ने गोळीबार केला. त्याबाबतचा व्हिडिओ समोर आला. व्हिडिओ समोर येताच, पोलिसांच्या कृतीवर आणि बळाच्या वापरावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले. प्रकरण चिघळल्यानंतर, पोलीस मुख्यालयाने संपूर्ण घटनेचा अहवाल मागवला. प्राथमिक तपासात व्हिडिओची पुष्टी झाल्यानंतर संबंधित अधिकाऱ्याला तात्काळ निलंबित करण्याचे आदेश जारी करण्यात आले. या प्रकरणी विभागीय चौकशीही सुरू करण्यात आली आहे. तपास अहवालाच्या आधारे पुढील कारवाई केली जाईल.

**दोन तास दगडफेक आणि लाठीमार**

येथे २५ जुलै रोजी पोलीस आणि आंदोलकांमध्ये जोरदार दगडफेक आणि लाठीचार्ज झाला. काही आंदोलक गांधी मैदानातील मंचावर चढून **(पान ४ वर)**

## मोराणे येथील घरफोडीत ७४ हजारांचा ऐवज लंपास

धुळे, दि. २७ - मोराणे येथील पांडव नगरमध्ये घराचे कुलूप तोडून रोकडसह, सोने चांदीचे दागिने असा ७४ हजारांचा ऐवज लंपास केला. आज सकाळी घरफोडी झाल्याचे उघडकीस आले. धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

मोराणे येथील पांडव नगरमध्ये विवेक सतिष सोनार यांचे निवासस्थान आहे. विवेक सोनार कुटुंबासह बाहेरगावी गेल्याने घर बंद होते. याचाच फायदा घेत चोरट्यांनी मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. कपाट फोडून सोन्याची पोत, अंगठी तसेच चांदीच्या साखळ्या, रोकड असा एकूण ७४ हजारांचा ऐवज लंपास केला. घरातील साहित्यही अस्ताव्यस्त केले. आज सकाळी घरफोडी झाल्याचे उघडकीस आले. याप्रकरणी धुळे तालुका पोलीसांना माहिती देण्यात आली. पोलीस निरीक्षक धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने घटनास्थळाची पाहणी केली. दुपारनंतर धुळे तालुका पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल झाला.

# आपला महाराष्ट्र

## जंतर मंतरचे आंदोलन आणि राजिनाम्याचा अन्वयार्थ

जंतर–मंतरवर उभे राहिलेले युवकांचे आंदोलन भारतीय लोकशाहीतील नव्या आशेचे प्रतीकच म्हणावे लागेल. शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा हा या संघर्षाचा शेवट नसून एका नव्या पर्वाची सुरुवात आहे हेही लक्षात घ्यावे लागेल. कारण या सरकारमध्ये राजीनामे होत नसतात अशी दर्पोक्ती सातत्याने पसरविली जात होती .जंतरमंतर इतकेच किंबहुना त्यापेक्षाही अधिक प्रभावी आंदोलन शेतकऱ्यांचे झाले.त्यात तर सातशेहून अधिक शेतकरी मृत्युमुखी पडले होते. शेतकरी ट्रॅक्टर घेऊन लाल किल्ल्यावर जाणार होते पण तो इरादा सरकारने नाकाम ठरविला. अखेर कृषी विषयक कायदे रद्द करावे लागले. शाहीन बाग आंदोलन देखील अभूतपूर्व होते. आणखीही काही आंदोलनांचा उल्लेख करता येईल.सत्तरच्या दशकात अत्यंत प्रभावी असे विद्यार्थ्यांचे आंदोलन लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली झाले होते . सर्वांनी त्याचा अनुभव घेतलेला आहे.एक आंदोलन मंडल आयोगाच्या संदर्भात झाले होते.त्यातही युवकच होते.त्यानंतर जंतर मंतरवर विद्यार्थ्यांचे आंदोलन झाले.हे एकमेव आंदोलन असे होते ज्यात मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी मध्यवर्ती होती.दबाव वाढला,कॉंग्रेस सह विरोधी पक्षाच्या आघाडीने संसदेत व अप्रत्यक्ष या आंदोलनास पाठबळ दिले म्हणून ते यशस्वी झाले यात वाद घालण्याचे काही कारण नाही.त्यामुळे शासक पक्षाची नशा खाडकन उतरली आहे.एरव्ही एक पक्ष एक देश,एक देश एक निवडणूक या सदराखाली विरोधकांचे खच्चीकरण चालू होते.निवडणूक ताब्यात घेण्याचे त्यांचे मनसुबे यशस्वी होतांना दिसत होते.फोडाफोडी करून संख्याबळ वाढविणे आणि सीमांकन विधेयक मंजूर करण्याची घाई झाली होती.त्यासाठी प्रादेशिक पक्षातील मोहरे गळाला लावण्याचे उद्योगही चालूच होते.आता ते उद्योग थांबतील असे वाटते. आता नवे मासे काठावरून खोल पाण्यात जाऊन आसरा घेतील अशी स्थिती निर्माण झाली आहे.

राष्ट्रीय लोकशाही आघाडीत या सर्व घडामोडीमुळे अश्वस्थता निर्माण होणे शक्य आहे.त्यातल्या त्यात आपला पक्षाचा फुगवटा वाढविण्यासाठी जे उसनवार प्यादे ओढून आणण्यात आले होते त्यांची तर पाचावरच धारण बसली असणार.तेव्हा सर्व शक्यतांचा अदमास घेऊनच शासकांना आखणी करावी लागेल.मनमानी किंवा एकाधिकारशाही यापुढे चालणार नाही.त्यासाठी तरूणाईत फाटाफूट होऊ देता कामा नये.एकंदर आंदोलनाचे स्वरूप बघता तसे काही होईल असे संभवत नाही.मंत्र्याचा राजीनामा हा इतिहास तरूणाईने नोंदविला.पण जो नवा प्रभारी आणला तो यापेक्षा काही वेगळे करण्याची शक्यता दिसत नाही.मुळात दोघे सोडून इतरांची अवस्था एच एम व्ही ची आहे.त्यामुळे नागनाथ गेला सापनाथ आला असेच चित्र आहे.परिणामी शिक्षण क्षेत्रात काही आमुलाग्र बदल होतील असेही काही दिसत नाही.मात्र युवकांनी ठरविले तर सगळ्याच क्षेत्रात शुध्दिकरण होऊ शकते त्या संबंधीची चुणूक या आंदोलनाने दाखवून दिली आहे.धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा पत्रात जी भाषा वापरली त्यात अहंकार आहे.वास्तविक त्यांचे पक्षातील स्थान,त्यांची कामगिरी,लक्षात घेता राजीनामा होणे शक्यच नव्हते.तरी पण तो झाला हे ऐतिहासिक सत्य आहे.त्यामुळे विद्यमान व्यवस्थेला कुठलाही निर्णय घेताना सतरा वेळा विचार करावा लागेल.आंदोलनाच्या यशानंतर भल्या भल्यांना युवा शक्तीबद्दल आत्मविश्वास निर्माण झाला.तशा चोहिकडून प्रतिक्रिया येत आहेत.पण यात काही कंगोरे आणि पदर आहेत तेही विसरता येणार नाही.ते कंगोरे आघाडीच्या नेत्यांनी लक्षात घेतले आणि अचूक व प्रगल्भपणे निर्णय घेऊन युवकांना पाठिंबा दिला ही भूमिका सकारात्मक होती.

हे आंदोलन शिक्षण सुधारणांबरोबरच रोजगार, पर्यावरण, समानता आणि संवैधानिक मूल्यांसाठीही होते ते प्रश्न सातत्याने युवक पुढच्या काळात जोडून ठेवू शकले, तरच त्याचे ऐतिहासिक महत्त्व सिद्ध होईल.राजीनामा ही तशी व्यवस्थेतील नैमित्तिक बाब असते पण या राजीनाम्याने लोकशाहीची दवंडी अनेक वर्षांनंतर पिटली हे महत्वाचे मानावे लागेल.इतिहासात काही राजीनामे हे केवळ पदबदलाचे नसतात; ते समाजाच्या बदलत्या जाणीवांचे दस्तऐवज ठरतात. तसा हा राजीनामा ठरला आहे.समताधिष्ठित शिक्षणव्यवस्था आणि व्यवस्थापरिवर्तनाची मागणी करत संघर्ष करणाऱ्या व आत्महत्या करणाऱ्या युवकांना ती एक प्रकारची श्रद्धांजलीच म्हणावी लागेल. मात्र, या यशाला अंतिम विजय समजणे चूक ठरेल, कारण खऱ्या परिवर्तनाचा प्रवास आता सुरू झाला आहे.असाच प्रवास जेपी आंदोलनाच्या वेळी सुरू झाला होता. त्याची परिणती जनता पार्टीच्या स्थापनेत व सत्तांतरात झाली होती.त्या सत्तांतराचे पुढे जे झाले ते सर्वश्रुत आहे.आताच्या आंदोलनातील म्होरक्यांचा इरादा अजून स्पष्ट झालेला नाही. हे आंदोलन फक्त शिक्षणाच्या शुध्दिकरणासाठी आणि नीट परीक्षेच्या पारदर्शितेसाठीच फक्त होते.असे म्हणणे भाबडेपणाचे ठरेल.त्वरित व्यक्त होण्याची घाई करणाऱ्यांसाठी कदाचित ते तसे असू शकते मात्र राजकीय पक्ष बनवून सत्तेचा सोपान काबीज करण्याचा इरादा ठेवणारांसाठी हा अंदाज निश्चितच नाही.त्यांचे लक्ष सत्ता असू शकते किंवा कुणाची तरी बी टीम होणेही असू शकते.परंतु आताच तसे अंदाज बांधणे धारिष्ट्याचे होईल.त्यासाठी काही काळ वाट बघावी लागेल.काळाच्या उदरात नेमके काय दडलेले आहे.सांगता यावयाचे नाही.सध्या तरी जो जिता वही सिकंदर म्हणता येईल.

काही विचारवंत जंतर–मंतरवरील या आंदोलनाकडे जनसत्याग्रहाच्या रूपात बघतात. सत्याग्रहात कोणी मित्र किंवा शत्रू नसतो. तरीही भारतातील युवकांनी ज्या शालीनतेने, साधेपणाने आणि संयमाने सरकारची यंत्रणा व पोलिसांकडून मिळालेला कठोर आणि वैरभावाचा व्यवहारही सन्मानाने सहन केला, ते भारतातच शक्य आहे.

भारतातील युवक त्या दृष्टीने अभिनंदनास पात्र आहेत. या आंदोलनाने मोठे यश मिळवले असले, तरी अजून अनेक पायऱ्या चढायच्या आहेत. युवकांना बेरोजगारीपासून मुक्ती हवी आहे. हवामान बदलाच्या संकटातून मुक्ती हवी आहे. आजारपणातून मुक्ती हवी आहे. प्रदूषण, शोषण आणि अतिक्रमणापासून मुक्ती हवी आहे. भ्रष्टाचारापासून मुक्ती हवी आहे. प्रश्नपत्रिका फुटण्याच्या प्रकारातून मुक्ती हवी आहे. स्वातंत्र्याच्या या लढ्याचे अनेक टप्पे अजून बाकी आहेत. पण असा विश्वास वाटतो की हे युवक पुढील वाटचालीवर गांभीर्याने विचार करत असतील.केवळ एवढ्या यशावर थांबणार नाहीत.युवकांनी ज्या स्वयंस्फूर्त पद्धतीने, साधेपणाने आणि सहजतेने हा संघर्ष यशस्वी केला, ते पाहून अनेकांचे डोळे पाणावले. कारण आतापर्यंत असेच वाटत होते की भारतातील युवक कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावाखाली अडकले आहेत. पण या आंदोलनात त्यांची नैसर्गिक बुद्धिमत्ता आणि भावनिक संवेदनशीलता दिसली. अनेक विचारवंत पन्नास वर्षांपूर्वी संपूर्ण क्रांती आंदोलनाचे सक्रिय कार्यकर्ते होते. त्यांनी विधायक कार्याची विविध क्षेत्रे व्यापली.त्या आंदोलनात अनेक राजकीय कार्यकर्ते होते ते पक्षीय राजकारणाच्या विळख्यात अडकले.मात्र या आंदोलनात पक्षीय राजकारण युवकांच्या समोर दिसले नाही .तर राजकीय पक्ष त्यांच्या मागे उभे होते. युवकांचे आंदोलन आघाडीवर होते आणि राजकीय शक्ती त्यांच्या पाठीशी उभ्या होत्या. त्यामुळे कोणत्याही पक्षाला हे आंदोलन आपल्या ताब्यात घेता आले नाही. हीच त्याची सर्वात मोठी ताकद आहे.

या आंदोलनातील दुसरी उल्लेखनीय गोष्ट म्हणजे त्यातील शिस्त होय. पोलिसांचा लाठीमार, हिंसा आणि २१ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याचा दावा केला जात असतानाही आंदोलनकर्त्यांनी संयम सोडला नाही. त्यांनी शिस्त राखली आणि निर्भयपणे संघर्ष सुरू ठेवला त्यात सहभागी झालेले लोक केवळ गर्दीचा भाग नव्हते. ते आपल्या ध्येयाशी निष्ठावान होते. ध्येय साध्य करण्यासाठी त्यांनी साधना केली आणि त्या साधनेत साधनशुचितेची जाणीवपूर्वक काळजी घेतली. म्हणूनच ते भारताच्या इतिहासातील लक्षणिय आंदोलन ठरले आहे .विभाजित, भयग्रस्त आणि धार्मिक संघर्षांनी वेढलेल्या वातावरणात सलोखा निर्माण करण्याची क्षमता या आंदोलनाने दाखवून दिली.महात्मा गांधींनी इंग्रजी सत्तेपासून मुक्तीसाठी आंदोलन उभारले. त्या आंदोलनात सर्व धर्म, सर्व जाती आणि सर्व समाजघटक सहभागी झाले होते. त्याचप्रमाणे या आंदोलनातही सर्व धर्मांचे आणि सर्व जातींचे युवक सहभागी झाले. त्यांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने आंदोलन पुढे नेले. या आंदोलनाचे नेतृत्व युवकांनी केले आणि सुरुवातीपासून शेवटपर्यंत ते युवकांचेच आंदोलन राहिले. ही त्यातील जमेची बाजू म्हटली पाहिजे. गांधीजीं स्वातंत्र्यलढ्यात एक पायरी चढल्यावर लगेच पुढील पायरीची तयारी करीत असत.त्याचबरोबर ते रचनात्मक कार्यक्रमही राबवत. चरख्याला त्यांनी भारताच्या स्वातंत्र्याचे प्रभावी साधन बनवले आणि लुटीला व प्रदूषणाला उत्तर दिले. आज त्या काळातील कंपन्यांपेक्षाही शेकडो–हजारो पटींनी मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या भारतातील समुद्र, पर्वत, जंगले आणि नद्यांवर वर्चस्व प्रस्थापित करीत आहेत. अशा परिस्थितीत युवकांनी आपल्या रोजगार,शिक्षण,पारदर्शकता आरोग्य,भ्रष्ट मुक्त व्यवस्था व निसर्गाच्या संरक्षणासाठी नवे पाऊल उचलणे गरजेचे वाटते.



## गुरूशिष्य स्मारकावर एकादशी निमित्त अभिवादन

धुळे दि.२७- खान्देश तेली समाज मंडळाच्या वतीने आषाढी एकादशीच्या निमित्ताने गुरूशिष्य स्मारकातील सद्गुरु संत तुकाराम महाराज व संताजी जगनाडे महाराज यांच्या पुतळ्यांना माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.


या निमित्ताने लिलाई मुलांचे वस्तीगृह साक्री रोड येथे मुलांना उपवास चे फराळ वाटप करण्यात आले.यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष विनोद राजू चौधरी विभागीय उपाध्यक्ष राजेंद्र माधवराव बागुल शशिकांत बळीराम चौधरी अनिल नाना अहिरराव अध्यक्ष कैलास आधार चौधरी सचिव रवींद्र जयराम चौधरी कार्याध्यक्ष मनोज मधुकर चौधरी उपाध्यक्ष जयवंत रामदास चौधरी राजेंद्र भटू चौधरी चंद्रकांत श्रीराम चौधरी किशोर पुंडलिक चौधरी प्रमोद महादू चौधरी नितीन मोतीलाल चौधरी राजेंद्र भाईदास चौधरी नटराज बाबुलाल चौधरी गजानन एकनाथ चौधरी राजेंद्र नथ्थू चौधरी मुकेश श्रीराम चौधरी रविंद्र वसंत चौधरी श्याम रामदास चौधरी तुषार भिमराव चौधरी आदी उपस्थित होते.

## स्व.देशपांडे वाचनालय विविध स्पर्धांचे आयोजन

धुळे, दि.२७- सत्कार्योत्तेजक सभेच्या स्व. श्रीमती जानकीबाई रघुनाथ देशपांडे मुक्तद्वार वाचनालयातर्फे सन २०२६-२७ या वर्षासाठी हस्ताक्षर स्पर्धा तसेच रंगभरण व चित्रकला स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा इयत्ता ५ वी ते ६ वी, ७ वी ते ८ वी आणि ९ वी ते १० वी अशा तीन गटांमध्ये आयोजित करण्यात येणार असून शाळांमार्फत तसेच वैयक्तिक नोंदणीद्वारेही विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. प्रवेश शुल्क दहा रूपये ठेवण्यात आले आहे.

हस्ताक्षर स्पर्धा शनिवार, दि.८ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता कोणत्याही माध्यमातील विद्याथी सहभागी होऊ शकता पण हस्ताक्षर स्पर्धा फक्त् देवनागरी लिपीतच होईल, तर रंगभरण व चित्रकला स्पर्धा त्याच दिवशी दुपारी ४.०० वाजता कि. सो. क. न्यू सिटी हायस्कूल, राणा प्रताप चौक, धुळे येथे होणार आहे. रंगभरण व चित्रकला स्पर्धेत इयत्ता ५ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना छापील चित्रावर रंग भरायचे आहेत. इयत्ता ९ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना दिलेल्या विषयांपैकी एका विषयावर स्वतः चित्र काढून रंगसंगतीसह पूर्ण करायचे आहे. दोन्ही स्पर्धांतील प्रत्येक गटातील विजेत्यांना शैक्षणिक साहित्याच्या स्वरूपात पारितोषिके तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. इच्छुक विद्यार्थी व शाळांनी दि. ३ ऑगस्ट २०२६ पर्यंत नावनोंदणी व प्रवेश शुल्क स्व. देशपांडे मुक्तद्वार वाचनालय, श्री समर्थ वाग्देवता मंदिर शेजारी, नानासाहेब देव पथ, रामवाडी, धुळे येथे जमा करावे. नावनोंदणीची वेळ सकाळी ८.३० ते १२.०० व दुपारी ४.३० ते सायंकाळी ७.०० अशी आहे. अधिक माहितीसाठी स्पर्धाप्रमुख प्रा. राजश्री शेलकर व अमित गोराणे तसेच ग्रंथपाल गौरव वाणी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

### प्रकाश में आज इन्कलाब




राजेश खन्ना, मुमताज, धीरज कुमार, जया सुधा, रीटा भादुडी, ए.के.हंगल

## आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयात विद्यार्थी पदग्रहण सोहळा उत्साहात संपन्न

**शिरपूर, दि.२६- येथील आर. सी. पटेल इंग्रजी माध्यमिक विद्यालयात विद्यार्थी पदग्रहण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न खाला. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, जबाबदारीची जाणीव, शिस्त, लोकशाही मूल्ये आणि संघभावना विकसित करण्याच्या उद्देशाने आयोजित या सोहळ्यास विद्यार्थी, पालक व मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.**




कार्यक्रमाची सुरुवात संस्थेच्या सचिव सौ. रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, सीए विजय भंडारी, सीईओ डॉ.उमेश शर्मा, प्राचार्य डॉ. अमोल परब, उपप्राचार्य जितेंद्र पाटील, मुख्याध्यापिका स्मिता पंचभाई, मुख्याध्यापिका मधुबाला राही, उपस्थित पालक यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली.

यावेळी विद्यार्थ्यांनी सब हो जाएगा या गीतावर सादर केलेल्या स्वागत नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना नेतृत्व, कर्तव्यनिष्ठा, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जपत जबाबदारीने कार्य करण्याचे आवाहन केले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यालयात शक्ती, तेज, कृती आणि शांती या मूल्यांचे प्रतीक असलेल्या हाऊसची स्थापना करण्यात आली. याप्रसंगी संबंधित हाऊसच्या ध्वजांचे अनावरण करण्यात आले. तसेच शालेय विद्यार्थी मंत्रिमंडळाची स्थापना करून इयत्ता पाचवी ते सातवी आणि आठवी-नववीमधील प्रत्येकी विद्यार्थी प्रतिनिधींची निवड करण्यात आली. याशिवाय सांस्कृतिक, क्रीडा, शिस्त, ग्रंथालय व समन्वय विभागांसाठी सहा विद्यार्थी पदाधिकाऱ्यांची तसेच हाऊस कॅप्टन (मुले व मुली) म्हणून विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

मान्यवरांच्या हस्ते निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना सॅश व बॅज प्रदान करण्यात आले. विद्यालयात प्रथमच कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशअल इंटेलिजन्स) आधारित ईव्हीएम प्रणालीद्वारे विद्यार्थी प्रतिनिधींची निवड करण्यात आली. प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेतून पार्श्व जैन याची विद्यार्थी प्रतिनिधी व अनुश्री सोनवणे हिची विद्यार्थिनी प्रतिनिधी म्हणून निवड झाली.

क्रीडा प्रमुख म्हणून दिपीन हासवानी व आरुषी रोकडे, शिस्त प्रमुख नक्षत्र पाटील व चानाक्षी जाधव, सांस्कृतिक प्रमुख अर्णव मौर्य व आदिश्री जांगिड, तसेच ग्रंथालय प्रमुख आयुष पाटील व अनुष्का पाटील यांच्याकडे पदभार सोपविण्यात आला. एकूण विद्यार्थ्यांनी विविध पदांची शपथ घेत जबाबदारी स्वीकारली.

यावेळी विद्यार्थी मंत्रिमंडळाने पदाची गोपनीयता, प्रामाणिकपणा व निष्ठेची शपथ घेतली. विशेष म्हणजे, या सोहळ्याचे विद्यालयातील सर्व वर्गांमध्ये झूम मीटिंगद्वारे थेट प्रक्षेपण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी हा सोहळा उत्स्फूर्तपणे पाहिला.

कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. अमोल परब व उपप्राचार्य जितेंद्र पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. क्रीडा शिक्षक अनुप चंडेल व क्रीडा शिक्षिका सुनीता पावरा यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. सूत्रसंचालन रवि सोनगिरे व सैफा अन्सारी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.



## बेलदार समाज उन्नती मंडळातर्फे गुणवंत व उद्योजकांचा सत्कार

**शहादा,दि.२७ (प्रतिनिधी)- धुळे- नंदुरबार जिल्हा बेलदार समाज उन्नती मंडळातर्फे गुणवंत मुला - मुलींचा, महिला उद्योजकांचा व सेवानिवृत्त समाज बंधू - भगिनींचा सत्कार समारंभ मंडळाचे अध्यक्ष रवींद्र बेलदार (चौपाळे) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.**

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून बेलदार समाज उन्नती मंडळाचे उपाध्यक्ष सोमेश्वर बेलदार, भगवान बेलदार (हातनूर), सचिव दिगंबर बेलदार, भारतीय कुमावत महासभेचे मा.कोषाध्यक्ष लक्ष्मण बेलदार, देवानंद कुमावत सर, ज्येष्ठ नागरिक बालू बेलदार, पोलीस पाटील निळकंठ बेलदार व अण्णा कुमावत आदी मान्यवर उपस्थित होते. कुमावत बेलदार समाजाचे आद्य दैवत श्रीरामाच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. दिवंगतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कुमावत समाज विकास सेवा संस्थेचे कोषाध्यक्ष व बेलदार समाज उन्नती मंडळाचे संस्थापक अध्यक्ष रघुनाथ बेलदार सर यांनी मंडळाविषयी माहिती प्रास्ताविक भाषणात दिली.

ज्येष्ठ नागरिक मोहन प्रकाशकर, एकनाथ बेलदार, काकासाहेब कुमावत व देविका बेलदार तसेच सेवानिवृत्त झालेले ताराबाई बेलदार, दिगंबर बेलदार, विठ्ठल बेलदार व विश्वनाथ बेलदार व महिला उद्योजक अर्चना बेलदार, तृप्ती कामे, शर्मिला बेलदार, नूतन बेलदार यांचा शाल, सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. गुणवंतामध्ये कृष्णा बेलदार (फार्मा डी), भुनेश्वरी कामे (बीएससी), विशाल बेलदार (पीएचडी), रागिनी बेलदार( एम.ए), नमो बेलदार( चित्रकला स्पर्धेत प्रथम) व उपस्थित १० वी, १२ वी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या मुला-मुलींचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्कूल बॅग, सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. शील्ड विठ्ठल बेलदार, भोजन विजय कुमावत, प्रमाणपत्र लक्ष्मण बेलदार, स्कूल बॅग राज्य पुरस्कार शिक्षिका सरला कामे यांच्याकडून वाटप करण्यात आल्या. नंतर देवानंद कुमावत (शिरपूर), हेमराज कुमावत, विशाल बेलदार व सचिन बेलदार यांनी विद्यार्थ्यांना व महिलांना मार्गदर्शन पर भाषणे केली.

कार्यक्रम यशस्वी करण्यास छोटुराम कुमावत, प्रितेश बेलदार, विशाल बेलदार, दिवाकर बेलदार, संदीप बेलदार, कैलास बेलदार, विजय कामे, विनोद बेलदार, पत्रकार रवींद्र चव्हाण, नरेंद्र बेलदार व मंडळाचे सभासद यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास धुळे- नंदुरबार जिल्ह्यातील बेलदार समाजातील बहुसंख्य महिला-पुरुष उपस्थित होते.

## मुकेशभाई पटेल सैनिकी शाळेत विजय दिनी शहिदांना श्रद्धांजली

**शिरपूर,दि.२७ (प्रतिनिधी) -श्री विलेपार्ले केळवाणी मंडळ, मुंबई संचलित तांडे येथील मुकेशभाई आर.पटेल मुला-मुलींची सैनिकी शाळा व कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयात जुलै रोजी सकाळी वाजता कारगिल दिवसाचे औचित्य साधून कारगिल युद्धात शहिद झालेल्या जवानांना शाळेचे प्राचार्य दिनेशकुमार राणा यांच्याद्वारे पुष्पचक्र अर्पण करुन श्रद्धांजली वाहण्यात आली.**

कार्यक्रमाची सुरुवात भारतीय जवानांना समर्पित असे देशभक्तीपर भावनांनी युक्त भावगीत विद्यार्थ्यांद्वारे सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सादर केलेले बढे चलो या देशभक्तीपर गीतामुळे संपूर्ण कार्यक्रमात देश प्रेमाची चेतना निर्माण झाली. कारगिल दिवसाचे औचित्य साधून ईन्वेस्टीचर सेरेमनी विद्यार्थी प्रतिनिधी नियुक्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. त्याद्वारे विविध विभागात उत्तम कामगिरी बजावणाऱ्या विद्यार्थ्यांना पदभार देऊन सन्मान करण्यात आला.

सदर सोहळ्याचे आयोजन करण्यासाठी क्रीडा समन्वयिका श्रीमती ज्योत्स्ना जाधव, शिक्षक शशिकांत जाधव, क्रीडा शिक्षक ज्ञानेश्वर माळी यांनी मुख्य भूमिका बजावली. मुख्य विद्यार्थी प्रतिनिधी प्रखर दुबे, मुख्य विद्यार्थिनी प्रतिनिधी ज्ञानेश्वरी पाटील, उपमुख्य विद्यार्थी प्रतिनिधी यशराज सुतार, उपमुख्य विद्यार्थीनी प्रतिनिधी संस्कृती टापरे, ज्युनियर उपमुख्य विद्यार्थी प्रतिनिधी खगेंद्र पाटील, ज्युनियर उपमुख्य विद्यार्थिनी प्रतिनिधी धनश्री शिवदे, क्रीडा विभाग कॅप्टन लोकेश सोनवणे, उप कॅप्टन मीत पाटील, रुद्र हाऊस कॅप्टन पद सागर बोदाडे, उप कॅप्टन डिंपल भंगाळे, मार्गदर्शक शिक्षक यतीन पाटिल, विक्रांत कॅप्टन नीरज कुंभार, उप कॅप्टन हर्षदा पाटील, मार्गदर्शक शिक्षक ज्ञानेश्वर पाटील, भीष्म कॅप्टन मयूर वाडीले, उप कॅप्टन कल्याणी नवले, मार्गदर्शक शिक्षिका चैताली बागुल, ब्रह्मोस हाऊस कॅप्टन धीरज चव्हाण, उप कॅप्टन मधुमिता पाटील, मार्गदर्शक शिक्षक शरद पवार, विविध विभागातील पदभारही विद्यार्थ्यांना देण्यात आले. या विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या.

त्यानंतर मातृभूमीला समर्पित असे देशभक्तीपर गीतावर विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्यद्वारे वीर जवानांना भावना प्रकट केल्या. प्राचार्य दिनेशकुमार राणा यांच्या हस्ते शपथ विधी सोहळा संपन्न झाला. सैनिकी निर्देशक मनोज पाटील यांनी कारगिल युद्धातील शहिदांच्या पराक्रमाच्या गाथा सांगून कारगिल युद्धाच्या इतिहासाची ओळख करुन दिली. यादरम्यान त्यांनी त्यांच्या सैन्य सेवेतील कारकिर्दीतील चित्त थरारक घटनांचा उल्लेख करत विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना निर्माण केली. उल्लेखनीय बाब म्हणजे सैनिकी क्षेत्रामध्ये कुठलाही पंथ जात धर्म मानला जात नसून फक्त भारतीय सैनिक हीच ओळख असते असा संदेश विद्यार्थ्यांना मिळाला.

प्राचार्य दिनेशकुमार राणा यांनी विद्यार्थ्यांना सैनिकी विद्यालयाचे महत्त्व सांगताना सैनिकी विद्यालय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी काय महत्त्वाची भूमिका बजावते यावर भर दिला. जिद्द ,चिकाटी व शिस्त या गुणांद्वारे विद्यार्थ्यांनी यशाची शिखरे गाठून देशाची सेवा करावी अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विद्यार्थिनी मार्वी साळवे व प्रियम वळवी यांनी केले.

### शब्दकोडे क्रमांक : २४२२



**आडवे शब्द :** १.इच्छा, आकांक्षा किंवा आस ४.महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध जिल्हा६. कोणतेही कार्य किंवा सोपवलेले उद्योग७. एक सुंदर पांढरा पक्षी ८.दोन व्यक्तींमधील मोठे भांडण किंवा वाद ९.चोर किंवा प्राणी पकडण्याची व्यूव्ह रचना ११. मोठा जलाशय किंवा तळे१२.रद्द किंवा निरुपयोगी ठरवणे १५.प्रभू श्रीरामांचे घराणे किंवा कू १८. रस्ता बनवण्यासाठी वापरले जाणारे छोटे दगड १९. नजर टाकणे किंवा पाहाणे २०.गब-उलट लिहा २१. हाताचा तळवा २३.दिवाळीतील एक काटेरी व खुसखुशीत फराळ २४.झाड-हिंदीत २५.वजन करण्याचे साधन किंवा तराजू २६.कायदा-इंग्रजीत २७.श्वास घेण्याचे इंद्रिय २८. मनःशांती किंवा आराम ३०. भालचंद्र नेमाडे यांची अत्यंत प्रसिद्ध कादंबरी ३३.उजवा-विरुद्ध ३५.संपत्ती किंवा वस्तूंची विभागणी ३७. शुभप्रसंगी दिली जाणारी मानाची भेटवस्तू ३८.हो-इंग्रजीत ३९.सत्याने वागणारा ४१. एकदम सरळ, सुटसुटीत किंवा सामान्य ४२.विहिरीतून पाणी काढण्याचे जुने साधन ४३. एक मराठी आडनाव ४६.विशेष किंवा महत्त्वाचे ४७.हर्ष,आनंद ४९.फळाच्या आतील मऊ गाभा ५०.एकाच लयीत पाहाणे ५१.ताक घुसळण्याचे पारंपरिक साधन ५२.खूप लोकांचा गोंगाट किंवा आवाज **उभे शब्द :** १.स्वतःबद्दल वाटणारा अवाजवी गर्व किंवा घमेंड २.एक प्रसिद्ध भारतीय टेनिस पटू 'लिॲंडर **' ३.प्रवासादरम्यान वाटेत टाकलेला तात्पुरता मुक्काम ४.पूर्वीच्या काळी राजाने दिलेली जमीन किंवा वतन ५.अमेरिकेची विख्यात अंतराळ संस्था ६.गोरा-विरुद्ध ८.व्यापारासाठी सागरातून प्रवास करणारा नावाडी वा व्यापारी १०.पाय ११.आमटीवर तरंगणारा तेलाचा थर १३. एखाद्या गोष्टीची गांभीर्याने नोंद घेणे १४.मोगलाई १६.रात्रीच्या अंधारात स्पष्ट पाहू शकणारा पक्षी १७.पिसारा फुलवून नाचणारा एक पक्षी १९.फुकटची बडबड २१.कलाकार सादर करतो ती २२.न्यायालयीन काम स्थगित करणे २४.बाहेरून हिरवे व आतून पांढरे/गुलाबी असलेले एक फळ २९.चंचल ३१.समुद्राची उसळणारी लहर ३२.कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी किंवा आदरयुक्त हाक ३४.वाद ३६.वारा ४०. मसाल्यातील एक जिन्नस ४१.माहेर-विरुद्ध ४२.गणपतीस आवडणारे एक खाद्यपदार्थ ४४.दया ४५.उशीर-इंग्रजीत ४८.कल-उलट लिहा

### शब्दकोडे क्रमांक : २४२१ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ज | ल | सा | ठा | | प | री | क्षा | | मि | त | वा |
| ल | | न | | वि | | का | र | खा | ना | | टी |
| द | व | | का | र | ना | मा | | न | र | म | |
| | डा | का | | ज | म | | दा | दा | | हा | त |
| ता | | का | र | ण | | वा | | न | व | ल | |
| श | र | म | न | | स | न | ई | | त | | स |
| | म | ला | | वि | का | र | | जा | न | व | र |
| पो | | वा | घ | | ळ | | रे | डा | | सा | स |
| क | व | च | | अ | | ना | व | | रा | ह | |
| ळ | | वा | द | ग्र | स्त | | ती | स | | त | ह |
| | का | | गा | | व | स | | ह | म | | ल |
| वा | स | ना | | अ | न | ब | न | | ग | ल | का |

TO BOOK TICKETS SCAN THE QR
ज्योती सिनेमा 3D JYOTI
DOLBY DIGITAL PLUS




ता. २३ से रोज १ खेल टा. १२ बजे
(हिंदी मध्ये) धमाल- 4
book my show
9422789999/9823177599 Jyoticinemadhule.

TO BOOK TICKETS SCAN THE QR
ज्योती सिनेमा 3D JYOTI
DOLBY DIGITAL PLUS




ता. २३ से रोज ३ खेल टा. २:४५,६,९:१० बजे
(हिंदी मध्ये) जननेता
book my show
9422789999/9823177599 Jyoticinemadhule.

पान १ वरुन

## पांझरेत २२७६ क्युसेस विसर्ग

अक्कलपाडा धरणात पाणीसाठा वाढत आहे. त्यामुळे धरणाची काळजी घेण्यासाठी आज सकाळी सहाच्या सुमारास धरणातून दोन हजार २७६ क्युसेस पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. होणारा पाऊस आणि धरणात येणारे पाणी पहाता विसर्गात वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पांझरा नदीच्या दोन्ही तीरावरील गावांतील नागरिक तसेच धुळे शहरातील नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांनी नदीपात्रात किंवा नदीकाठावर जाणे टाळावे. प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता यांच्यासह पाटबंधारे विभागाचे धुळे आणि साक्रीचे उपविभागीय अधिकारी, तसेच शाखा अधिकारी यांनी केले आहे. प्रशासनाने परिस्थितीवर सतत लक्ष ठेवले असून नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहून कोणत्याही अफवेवर विश्वास ठेऊ आणि त्याबाबत चर्चाही करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

## धुळे लोकसभेच्या विविध प्रश्नांवर

प्रक्रिया तसेच मूल्य स्थिरीकरण निधी योजनेअंतर्गत कार्यरत खरेदी संस्थांच्या कागदपत्राधारित पडताळणीचा मुद्दाही केंद्रीय गृहमंत्री तथा सहकार मंत्री श्री. अमित शाह यांच्या निदर्शनास आणून देण्यात आला. संबंधित यंत्रणांकडून या प्रक्रियेची वेळबद्ध आणि प्राथमिक कागदपत्रांच्या आधारे पडताळणी करण्याची मागणी खासदार डॉ. शोभाताई बच्छाव यांनी केली.

धुळे लोकसभा मतदारसंघातील जनतेची सुरक्षितता, कायदा व सुव्यवस्था, शेतकरी हित आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी केंद्र शासनाच्या पातळीवर थेट पाठपुरावा करण्याची खासदार डॉ. शोभाताई बच्छाव यांची भूमिका या भेटीतून पुन्हा अधोरेखित झाली आहे. केंद्रीय गृहमंत्र्यांसोबत झालेल्या या महत्त्वपूर्ण भेटीमुळे येत्या काळात धुळे लोकसभा मतदारसंघासाठी सकारात्मक आणि दूरगामी स्वरूपाचे निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## बिहार बंद प्रसंगी थेट एके-४७ मधून गोळीबार

तेथून पोलिसांवर दगडफेक करू लागले, असा आरोप आहे. यानंतर, पोलिसांनी आंदोलकांना पांगवण्यासाठी आधी अश्रुधुराच्या नळकांड्या फेकल्या आणि नंतर लाठीमार केला. पोलिसांच्या कारवाई नंतर, आंदोलकांनी गांधी मैदान सोडले आणि शहराच्या विविध भागांमध्ये पांगले. दगडफेकीत एसपी पुरण झा यांच्या हाताला दुखापत झाली.

### तीन विद्यार्थी जखमी

सिवानमधील गोळीबारात तीन विद्यार्थी जखमी झाले. दोघांच्या मानेला गोळी चाटून गेली, तर एका विद्यार्थ्याच्या मांडीत गोळी अडकली आहे. मानेत गोळी लागल्याने गंभीर अवस्थेत असलेल्या एका विद्यार्थ्याला पाटणा येथे हलवण्यात आले. इतर दोन विद्यार्थ्यांना नंतर पाटणा येथे दाखल करण्यात आले.

### मोदीजी, तुमचे वचन कुठे आहे - गांधी

राहुल गांधींनी या संपूर्ण मुद्द्यावरून केंद्र सरकार आणि पंतप्रधान मोदींवर निशाणा साधला आहे. त्यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे प्रश्न उपस्थित केले. त्यांनी लिहिले, संपूर्ण व्यवस्था विद्यार्थ्यांच्या विरोधात घातक झाली आहे. बिहारमध्ये आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर ए.के.-४७ चा वापर झाल्याचे वृत्त आहे. शेकडो विद्यार्थ्यांना अटक करून त्यांच्यावर एफआयआर दाखल केले जात आहेत. विद्यार्थ्यांविरुद्ध एफआयआर दाखल होणार नाहीत आणि त्यांची सुटका केली जाईल, असे दिलेले वचन कुठे गेले, हे मोदीनी सांगितले पाहिजे. तुमचे वचन कुठे आहे? उलट, विद्यार्थ्यांवर प्राणघातक हल्ला करीत क्रूरता केली जात आहे. दिल्लीत विद्यार्थ्यांवर पेलेट गन चा वापर झाला. बिहारमध्ये एके-४७ चा वापर झाला. उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार किंवा दिल्ली असो, सर्वत्र पध्दत तीच आहे. मी हे आधीच सांगितले आहे. हे सरकार खोटारडे आहे. सुधारणा करणे त्यांच्या आवाक्याबाहेर आहे. ते आपले शब्द फिरतील आणि प्रत्येक डावपेच वापरून विद्यार्थ्यांचा आवाज दाबतील. मोदी तुम्ही देशातील विद्यार्थ्यांची माफी मागा. विद्यार्थ्यांवर हल्ला करून त्यांना चिरडणाऱ्यांवर कारवाई करा, विद्यार्थ्यांवर नाही. भाजपने राहुल गांधींच्या आरोपांना अफवा आणि दिशाभूल करणारे म्हटले आहे. आंदोलने भडकवण्याचा आणि अराजकतेचे वातावरण निर्माण करण्याचा आरोप करत, भाजपने माफीची मागणी केली आहे.

### गोळीबार कोणाच्या आदेशाने झाला?

बिहारचे विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांनी विचारले, बिहारमध्ये कोणाच्या आदेशाने एके-४७ चालवण्यात आल्या? तुम्ही व्हिडिओ पाहिल्यास, एके-४७ मधून हवेत गोळीबार झाला नाही, तर लक्ष्य साधून गोळीबार करण्यात आला. तीन विद्यार्थ्यांना गोळ्या लागल्या.एके-४७ चालवणाऱ्या एका जवानाचा व्हिडिओ शेअर करत त्यांनी लिहिले, मउद्या कोणताही पोलीस कोणत्याही नेत्यावर, मंत्र्यावर किंवा अगदी मुख्यमंत्र्यांवर, कधीही, कुठेही, कोणत्याही कारणाशिवाय गोळीबार करू शकतो का? असा प्रश्न राहुल गांधी यांनी उपस्थित केला आहे.

## क्रूरतेचे समर्थन नाही - सुप्रीम कोर्ट

कर्मचाऱ्यांवर होणारे हल्ले तितकेच चिंताजनक आहेत आणि सरकारने यावर उत्तर दिले पाहिजे. न्यायालय आता मंगळवारी या सर्व याचिकांवर एकत्रितपणे सुनावणी घेणार आहे.

नीट पेपरफुटी आणि शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याविरोधात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेल्या क्रूरतेचा आरोप या याचिकांमध्ये करण्यात आला आहे. या याचिका २० जुलै रोजी झालेल्या कॉकरोच जनता पक्षाच्या (सीजेपी) संसद मोर्चाशी संबंधित आहेत. जंतर मंतरपासून संसदेपर्यंत मोर्चा काढण्यात आला. या आंदोलनात आंदोलक आणि पोलिसांमध्ये अनेकदा चकमकी झाल्या. काही आंदोलकांनी बॅरिकेड्स तोडून संसदेच्या दिशेने मोर्चा काढला. त्यानंतर पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फेकल्या. रात्री उशिरा दगडफेकीची छायाचित्रे समोर आली. ज्यात १०० पेक्षा अधिक लोक जखमी झाले. सायंकाळी पाचपर्यंत पोलिसांनी जंतर मंतर मोकळा केला असला तरी, रात्री ११ वाजण्याच्या सुमारास सीजेपीचे समर्थक जंतर मंतरवर पोहोचले आणि त्यांनी पुन्हा आंदोलन सुरू केले.

दुसरीकडे, संसदेतही आज विरोधी खासदारांनी मोदी-शाह यांनी विद्यार्थ्यांची माफी मागावी अशी मागणी करत घोषणाबाजी केली. लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांनी सभागृहाचे कामकाज दुपारी दोन पर्यंत तहकूब केले. राज्यसभेचे कामकाजही दुपारी दोन पर्यंत तहकूब करण्यात आले. विरोधी पक्षांनी मकरद्वार येथे आणि संसदेबाहेर आंदोलन केले. काँग्रेससह इतर विरोधी पक्षांचे नेते नीट पेपरफुटी आणि विद्यार्थ्यांवरील पोलीस कारवाईबाबत सरकारकडून उत्तरांची मागणी करत आहेत. दरम्यान, माजी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी सोमवारी राजीनामा दिल्यानंतर पहिल्यांदाच संसदेला भेट दिली.

## आता ई-२० पेट्रोलचा मुद्दा

होण्याआधीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या समस्येवर तात्काळ योग्य आणि ठोस तोडगा काढावा, अशी जोरदार मागणी केजरीवाल यांनी केली आहे. ई-२० पेट्रोल विरोधात पक्षाची पुढील रणनीती ठरवण्यासाठी येत्या शनिवारी दुपारी बाराला दिल्लीतील कॉन्स्टिट्यूशन क्लबमध्ये एका टाऊन हॉल मध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत इंधन आणि ऑटोमोबाईल क्षेत्रातील तज्ज्ञांना आमंत्रित केले जाणार असून, ई-२० पेट्रोलचे दुष्परिणाम आणि संभाव्य उपायांवर सविस्तर चर्चा केली जाईल.

केजरीवाल यांनी सांगितले की, या बैठकीत देशभरातून लाखो नागरिक प्रत्यक्ष आणि ऑनलाईन माध्यमातून सहभागी होतील. दिल्लीत येणे शक्य नसलेल्या लोकांसाठी ८५८८८३३५४८ हा ऑनलाईन संपर्क क्रमांक जाहीर करण्यात आला आहे. याशिवाय, ई-२० इंधनाविरोधात पंतप्रधानांच्या नावे सुरू केलेल्या ऑनलाइन याचिकेवर आतापर्यंत दोन लाख नागरिकांनी आपल्या स्वाक्षऱ्या आणि सूचना नोंदवल्याची माहितीही त्यांनी दिली.

पान १ वरुन

## अन्न-औषध निरीक्षक प्रश्नपत्रिका फुटली-पवार

विद्यार्थ्यांच्या मनात या भरती प्रक्रियेबाबत साशंकता निर्माण झाली आहे. सर्व बाबी लक्षात घेता या भरती प्रक्रियेची स्वतंत्र, निष्पक्ष व वेळबद्ध चौकशी करण्यात यावी. भरती प्रक्रियेतील नियुक्त्या या स्वतंत्र चौकशी पूर्ण होईपर्यंत स्थगित करण्यात याव्यात. परीक्षेतील गैरव्यवहाराची व्याप्ती पाहता सदर परीक्षा रद्द करून पुन्हा एकदा परीक्षा घेण्यात यावी, अशी मागणी करत तुकाराम मुंढे यांनी लक्ष घालावे, असे रोहित पवार यांनी म्हटले आहे.

### एमपीएससीकडून तपास सुरू

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत २२ मार्च २०२६ रोजी घेण्यात आलेल्या औषध निरीक्षक भरती प्रक्रियेत पेपर फुटल्याचा आरोप झाल्याने खळबळ उडाली होती. मात्र, एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, एका तक्रारदाराने स्वतः ई-मेल पाठवून कोणतीही तक्रार नसल्याचे कळवले आहे. या प्रकरणात आता रीतसर पोलीस तक्रार दाखल करण्यात येणार असून एमपीएससीकडून त्याचा तपास सुरू असल्याची माहिती महेंद्र हरपाळकर यांनी दिली. तक्रार करणाऱ्या दोघांनाही आयोगाने चौकशीसाठी बोलावले होते. मात्र, दोघेही अनुपस्थित राहिले. दरम्यान, तक्रारदाराच्या मित्राने आयोगाला एक मेल केला आहे. त्यात तक्रार करणाऱ्या ऋषिकेश गांगर्डे याने संभ्रम पसरवण्यासाठी ही तक्रार केल्याचा दावा केला आहे. एका तक्रारदाराने आता कोणतीही तक्रार नसल्याचे सांगत माघार घेतली आहे, असेही आयोगाने म्हटले आहे.

## कापडण्याच्या शेतकऱ्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

तालुक्यातील कापडणेसह परिसरातील गावांना शेतीसाठी व पिण्याच्या पाण्यासाठी होत असतो. यंदा अजूनही खरीपाचा पाऊस समाधानकारक नाही, त्यामुळे शेतकऱ्यांवर दुष्काळाचे सावट आहे. त्यातच रेल्वेमार्गाचे काम करीत असतांना सोनवद प्रकल्पाची सदर पाटचारी तुटलेली असल्याने यंदा पांझरेचे पाणी सोनवद प्रकल्पात टाकण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. परिणामी शेतकरी व ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. रेल्वे प्रशासनाकडून रेल्वे मार्गनिर्मितीचे काम सुरु आहे. सदर काम करीत असतांना पांझरा नदीपासून निघालेल्या सोनवद प्रकल्पाच्या पाटचारीचे खोदकाम करण्यात आले आहे,तसेच संरक्षक भिंत देखीत तोडण्यात आली आहे. रेल्वे प्रशासन व पाटबंधारे विभागाच्यावतीने सदर पाटचारी अद्यापही दुरुस्त करण्यात आली नाही.परिणामी शेतकरी व ग्रामस्थांचा पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होणार आहे. त्यामुळे सोनवद पाटचारी व संरक्षक भिंतीचे काम करुन ती पूर्ववत करण्यात यावी,सोनवद प्रकल्प भरण्यासाठी पाणी सोडण्यात यावे आणि कमी पावसाच्या पार्श्वभूमीवर सोनवद प्रकल्प वेळेवर भरण्याबाबत विशेष कृती आराखडा तयार करण्यात यावा अशी मागणी कापडणे तसेच परिसरातील शेतकऱ्यांनी निवासी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाव्दारे केली आहे. तसेच शेतकऱ्यांनी कार्यकारी अभियंता,सिंचन(पाटबंधारे विभाग)धुळे यांनाही आपल्या मागणीचे निवेदन दिले. यावेळी कापडणे माजी उपसरपंच राजा पाटील,नवल पाटील,सेवा सोसायटी चेअरमन संतोष पाटील,भगवान पाटील,योगेश पाटील, भूषण ब्राम्हणे,प्रशांत पाटील,विजय चौधरी,कोळी बापू, संजय जैन,गणेश सैंदाण आदी शेतकरी उपस्थित होते.

### पाटचारी दुरुस्तीच्या सूचना-मा.आ.कुणाल पाटील

सोनवद पाटचारी रेल्वेमार्गाचे काम करतांना तुटल्याने प्रकल्प भरण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी तसेच पाटबंधारे विभागाने तातडीने या प्रश्नाची दखल घेवून पाटचारी व संरक्षक भिंत दुरुस्त करुन द्यावी. त्याचप्रमाणे सोनवद प्रकल्प भरण्यासाठी पाणी सोडण्यात यावे यासाठी संबधित विभागाशी चर्चा झाली आहे, आणि तत्काळ दुरुस्तीचे काम हाती घेण्यात यावे अशाही सूचना दिल्या आहेत.

## विजय चौधरींच्या संभाषणाच्या क्लिप व्हायरल

करण्यात आली आहे. अन्यथा जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात निवेदन दिल्यानंतर भाजपाचे तालुकाध्यक्ष दीपक पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी सभापती हेमलता शितोळे, भाजपाचे माजी प्रदेश सदस्य प्रकाश चौधरी, भाजपाचे प्रदेश सदस्य अविनाश माळी, भारतीय जनता पार्टीचे माजी गटनेते चारुदत्त कळवणकर यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधून संतप्त भावना व्यक्त केल्या. यावेळी अनिल भामरे, नगरसेवक पंकज चौधरी, आकाश चौधरी, माजी नगरसेवक संतोष वसईकर, ॲड. प्रकाश भोई तसेच ग्रामीण व शहरी भागातील सक्रिय कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विजय चौधरी विरुद्ध ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

चुलत बहिणी असलेल्या अनुसूचित जमातीच्या महिला माजी खासदाराबाबत तसेच आमदार डॉ. विजयकुमार कृष्णराव गावीत यांच्याबाबत कथितरित्या आक्षेपार्ह व अवमानकारक शब्दप्रयोग केले. त्यानंतर या संभाषणाचे कॉल रेकॉर्डिंग जाणीवपूर्वक सोशल मीडियावर व्हायरल करून संबंधित महिला लोकप्रतिनिधीची बदनामी व सार्वजनिक अपमान केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, संबंधित महिला अनुसूचित जमाती प्रवर्गातील असल्याची माहिती असतानाही त्यांचा जाणीवपूर्वक अपमान करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी गुन्हा रजिस्टर क्रमांक ६९९/२०२६ नोंदविण्यात आला असून पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्या नियंत्रणाखाली नंदुरबार शहर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## भादवड आश्रमशाळेचे मुख्याध्यापक

सापळा अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक रेश्मा अवतारे यांनी काम पाहिले. त्यांच्या पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही कारवाई यशस्वी केली. दरम्यान, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणताही शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी शासकीय कामासाठी लाचेची मागणी करत असल्यास किंवा लाच स्वीकारत असल्यास तात्काळ एसीबीशी संपर्क साधून तक्रार नोंदवावी.

## जोहर युनिव्हर्सिटीच्या ३८ इमारतींवरील पाडण्याची

राजकीय आकसापोटी किंवा तांत्रिक त्रुटींचे कारण पुढे करून अशी मालमत्ता नष्ट करणे देशाच्या प्रगतीला घातक आहे. भारतीय संविधानाच्या कलम २९ आणि ३० नुसार अल्पसंख्याकांना शैक्षणिक संस्था स्थापन व संचलित करण्याचा अधिकार मिळाला असून, ही कारवाई संविधानाने दिलेल्या या अधिकारांचे उल्लंघन करणारी आहे. तांत्रिक त्रुटींसाठी बुलडोझर कारवाईचा मार्ग निवडणे हे नैसर्गिक न्यायाच्या विरोधात असल्याचेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

प्रमुख मागण्यांमध्ये केंद्र सरकारने ३८ इमारतींच्या पाडकामाच्या नोटिसीला तात्काळ स्थगिती द्यावी. या संपूर्ण प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांमार्फत निष्पक्ष चौकशी केली जावी. जमिनीच्या किंवा बांधकामाच्या तांत्रिक त्रुटी असल्यास दंड वसूल करून त्यांचे नियमितीकरण करण्यात यावे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वातावरण अबाधित राहील याची खात्री द्यावी.

निवेदनावर जमीयत उलेमा धुळेचे अध्यक्ष हाफिज हिफ्जुर्रहमान, सचिव मुश्ताक सुफी, सचिव मौलाना शकील कासमी, आतीक अरशद, सक्लौन अंसारी, परवेझ शेख, जुनेद पठाण, एजाज अहमद, मोईनभाई, अमीन पटेल, हाजी अयाज अह. अयाज, मुख्तार अन्सारी, वसीम बारी, म. युसुफ पायपार, अफसार पठाण, मौलाना मुकीन मिली व डॉ. शकील अहमद आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## नकाणे रोडवर मोकाट जनावरांचा ठिय्या वाहनचालक वैतागले; कारवाईची मागणी

**धुळे, दि. २७- शहरातील नकाणे रोड वर पंधरा मोकाट जनावरांनी ठिय्या मांडल्याने वाहन चालकांना वाहन चालविणे जिकरीचे झाले. शहरातील अतिक्रमण, प्लास्टीक कारवाई, कर वसुली वर महापालिकेने लक्ष केंद्रीत केले आहे. मोकाट जनावरांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. मोकाट जनावरांच्या मालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी. अशी मागणी वाहन चालकांमधून होवू लागली आहे.**



नकाणे रोडवर पंधरा ते सोळा जनावरांचा समुह संपूर्ण रस्त्यावर बसत असल्याने वाहन धारकांना वाहन चालविणे मुश्किल होते. या रस्त्यालगत मंदिर, खाजगी रूग्णालय आहेत. शाळा सुटल्यानंतर शालेय विद्यार्थी, महिलांसह नागरिकांची मोठ्या संख्येने वर्दळ असते. रस्त्याच्या मधोमध मोकाट जनावरे बसत असल्याने रस्ता ओलांडणे त्रासदायक ठरते. महानगरपालिकेची मोकाट जनावरांवर कारवाई करण्याची मोहिम ठंडवली असल्याने रहदारीचा त्रास वाढला आहे. मोकाट जनावरांमुळे अपघात होवून जीवितहानी होण्याची शक्यता आहे. प्रभाग क्र.६ मधील नगरसेवकांची नकाणे रोडनेचे जाणे-येणे आहे. महत्वाचे म्हणे महापालिकेचे स्वच्छता विभागाचे अधिकारीही नकाणे रोड परिसरातच वास्तव्याला आहे. ते देखील रस्त्यात बसलेल्या मोकाट जनावरांमधून मार्ग काढून पुढे जातात. परंतू कारवाईची हिम्मत मात्र कोणीही दाखवत नसल्याने नागरिकांमधून कुतुहल व्यक्त केले जात आहे.

महापालिकेचे मोकाट जनावर कारवाई करणारे पथकाने नागरिकांमधून तक्रार येत नाही तोपर्यंत कोणतीही कारवाई करायची नाही असे ठरवल्याने सामान्या नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागतो आहे. जनतेला सुविधा देण्यात कमी पडणारी महापालिका करवसुलीसाठी कायद्याचा बडगा उगारण्यास मागे पुढे पाहत नाही. मनपाला कर वेळेच्या आत भरला पाहिजे आणि सुविधा पुरविण्यात मात्र ढिलाई दाखवली जात असल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त केला जातो आहे. तसेच मोकाट जनावरांच्या मालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी. अशी मागणीही जोर धरू लागली आहे.

पान १ वरुन

## जीवे ठार मारण्याची धमकी गुन्हा दाखल करा- गाबडा

खंडपीठ औरंगाबाद व मा.सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे मंजित जात होता. याचा राग मनात ठेवून गौरव पवार व भगवान अहिरे यांनी बबुआ कंडारे याला मंजितला जीवे ठार मारण्याची सुपारी दिल्याचे गुड्डया चव्हाण याने दिली. बबुआ कंडारे हा सराईत गुन्हेगार असल्याने जीवितास भिती आहे.

गौरव पवार, भगवान अहिरे ह.मु.नाशिक मध्यवर्ती कारागृह, नाशिक व मयुर ऊर्फ बबुआ सुरेश कंडारे रा.धुळे यांच्या विरूध्द गुन्हा दाखल करण्यात यावा. अशा मागणीचा अर्ज मंजित अशोक गाबडा याने जिल्हा पोलीस प्रशासनाला दिला आहे.

## शिरपूर येथील वृद्धेच्या सोन्याच्या पोतीची चोरी

धुळे, दि. २७ - पादचारी वृद्धेच्या गळ्यातील सोनपोत बुलेटवरून आलेल्या चोरट्यांनी ओढून नेल्याची घटना शिरपूर येथील हिरा नगर परिसरात घडली. याप्रकरणी शिरपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

शिरपूर येथील आशीर्वाद हॉस्पिटलमागे मीना कैलास अग्रवाल (वय ६१, रा.हिरा नगर) याचे निवासस्थान आहे. घरासमोरील रस्त्यावर शनिवारी रात्री साडेआठच्या सुमारास त्या पायी फेरफटका मारत होत्या. यावेळी त्यांच्या पाठीमागून आलेल्या बुलेटवरील दोघांपैकी एकाने त्यांच्या गळ्यातील ८ ग्रॅमची सोन्याची पोत ओढून वेगात पसार झाले. १६ हजार रुपये सोनपोतची किंमत आहे. याप्रकरणी मीना अग्रवाल यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार गुन्हा दाखल झाला. सतत घडणाऱ्या घटनांमुळे नागरिकांच्या मनात भिती निर्माण झाली आहे.

## अक्कलपाड्यातील होणाऱ्या विसर्गाचे नियोजन करा- संग्राम पाटलांचे निवेदन

**धुळे, दि.२७- अक्कलपाडा धरणातुन होणाऱ्या पाण्याच्या विसर्गाचे नियोजन करून उजवा व डावा कालवा, उपकालवे, साठवण बंधारे व पांझर तलाव भरावे तसेच जिल्ह्यातील दुष्काळसदृश्य परिस्थिती लक्षात घेवून सिंचनासाठी कार्यावाही करण्यात यावी. या मागणीचे निवेदन जि.प.चे माजी कृषी पशुसंवर्धन व दुग्धशाळा सभापती संग्राम गोविंदराव पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे.**

निवेदनात नमुद केले आहे की, अक्कलपाडा धरणाची सुरक्षितता लक्षात घेता प्रशासनाने दोन हजार दोनशे शहात्तर क्युसेक पाण्याचा विसर्ग केला आहे. धुळे तालुक्यात कमी पावसामुळे अनेक गावांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थितीचा सामना केला जातो आहे. पाण्याच्या विसर्गाचा मोठा हिस्सा उजवा कालवा, डावा कालवा, उपकालवे, पाटचारीतून सोडण्यात यावे. उजवा व डावा कालवावर आधारीत सर्व साठवण बंधारे, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे, पाझर तलाव, जलसाठे भरून घेण्यात यावे. टंचाईग्रस्त गावांचा स्वतंत्र सर्व्हे करून त्या भागातील जलस्त्रोत भरण्याचे नियोजन करण्यात यावे. कालव्यांची दुरूस्ती करण्यात यावी. नदी पात्रात पाणी सोडण्यासह कालव्यामधूनही पणी सोडण्यात यावे. धरणातील पाण्याचा विसर्गाचे पुनर्नियोजन करून उजवा व डावा कालवा, पाझर तलाव भरण्याचे आदेश देण्यात यावे. अशी मागणीही माजी जि.प.सभापती संग्राम पाटील यांनी केली आहे.

निधन वार्ता

## गुलाबराव मोरे

शहादा, दि.२७- तालुक्यातील मंदाणे गावातील प्रगतीशील



शेतकरी गुलाबराव माधवराव मोरे (वय ८१) यांचे आज दि.२७ जुलै सोमवार रोजी दुपारी २ वाजता हृदयविकाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा उद्या दि.२८ जुलै मंगळवार रोजी सकाळी १० वाजता मंदाणे येथील राहत्या घरून निघेल. ते सेवानिवृत्त शिक्षक संजय गुलाबराव मोरे तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक तथा तिखोरा माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक किशोर गुलाबराव मोरे यांचे वडील तर स्वप्निल संजय मोरे यांचे आजोबा होत. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.


**पाहिजेत**
अकाऊंटच्या कामासाठी हुशार व अनुभवी मुलगा किंवा मुलगी पाहिजे. Tally Oprat करता यायला पाहिजे.
साईबाबा रेडीमेड ॲण्ड होजीअरी
गल्ली नं.२, मुल्लाबाडा रोड अकबर चौक, धुळे
9422286958
7350148955

**पाहिजेत**
टायपिस्ट म्हणून मुलगा/ मुलगी पाहिजेत. इच्छुकांनी सायंकाळी ६ वाजता समक्ष भेटावे.
अनुभवी व्यक्तीस प्राधान्य
श्रीविनायक डायग्नोस्टीक सेंटर
हॉटेल गणपती पॅलेस समोर, मालेगाव रोड, धुळे

**डिटीपी ऑपरेटर पाहिजेत**
इनडिझाईनमधे काम करु शकणारा डिटीपी ऑपरेटर चांगल्या पगारावर नेमणे आहे.
-: संपर्क :-
दै.आपला महाराष्ट्र
9422286496

**पाहिजेत**
कामासाठी हेल्पर मुलगी पाहिजे. समक्ष भेटा!
किड्स् शॉपी
टॉवर गार्डन जवळ, काँग्रेस भवनासमोर, धुळे
9422219164

**पाहिजेत**
• नर्स (ANM GNM)
• R.M.O
• रिसेप्शनिस्ट
• B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट
संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

**पाहिजेत**
कामासाठी पाहिजे
सेल्समन - २
सेल्सगर्ल - २
श्याम वॉच ॲण्ड गिफ्ट सेंटर
फुलवाला चौक, धुळे
7219036785
9960777594

**पाहिजेत**
विकास दुध पाऊच पॅकींग वाटपसाठी मुले पार्टटाईम पाहिजेत.
समक्ष भेटा- स.११ ते १२
विकास दुध, नवग्रही ग.न.२, उषा ड्रेसेस समोर, पारोळा रोड, धुळे
9890030422
8600773021

**भाड्याने देणे आहे**
जयहिंद सिनियर कॉलेज जवळील पेन्ट हाऊस देणे आहे. 3 BHK शासकीय, निमशासकीय अधिकारी वर्गासाठी
भुपेंद्र रनमळे
8149310000

**पाहिजेत**
होलसेल मेडिकलमध्ये कामासाठी मुले पाहिजेत.
१) कॉम्प्युटर ऑपरेटर
२) सेल्समन
३) दुकान काम हेल्पर
अनुभव असल्यास प्राधान्य.
-: संपर्क :-
8888096777

**पाहिजेत**
कापड दुकानासाठी खालील जागा भरणे आहे.
सेल्समन -३
हेल्पर - २
समक्ष येऊन भेटा
बेबीज वर्ल्ड
ग.नं.२, नानक हार्डवेअर, धुळे
9850835999





हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०